follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd. No. 72105/99 ∗ वर्ष २६ ∗ अंक ३४० ∗ सोमवार दि.९ सप्टेंबर २०२४ पाने ४ ∗ किंमत ५/-

# अजित पवारांच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

**बारामती :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जन सन्मान यात्रा सध्या सुरू आहे. आज अजित पवारांनी बारामतीमधील एका मेळाव्याला संबोधित केले. यावेळी मुद्द्यांवर भाष्य केले. यावेळी बारामतीतून निवडणूक लढणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव अजित पवारांना चांगलाच जिव्हारी लागला आहे. आजच्या कार्यक्रमात त्यांनीमनातील खदखद देखील बोलून दाखवली. या कार्यक्रमात अजित पवार नक्की काय म्हणाले आहेत, ते पाहुयात.

बारामतीमधील एका मेळाव्यात बोलताना अजित पवार म्हणाले, आपण लाखो मतांनी निवडून येणारी माणसे आहोत. आता मी ६५ वर्षांचा झालो आहे. आता मी समाधानी आहे. आता बारामतीवासियांना मी नाही तर दुसरा आमदार मिळाला पाहिजे.



अजित पवारांच्या या वक्तव्यानंतर उपस्थित कार्यकर्त्यांनी मोठी घोषणाबाजी सुरू केली. 'एकच दादा, अजित दादा ' अशा घोषणा कार्यकर्त्यांनी द्यायला सुरूवात केली.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, जिथे पिकते तिथे विकत नाही. एकदा मी सोडून बारामतीवासीयांना दुसरा आमदार मिळाला पाहिजे. त्यानंतर तुम्ही नवीन आमदाराच्या आणि माझ्या कामाची तुलना करा. बारामतीवासीयांना न सांगता सर्व काही मिळत गेले. न सांगता चांगले रस्ते मिळाले. न सांगता पिण्याच्या योजना आली. न मागता मेडिकल कॉलेज मिळाले. सध्या बारामती शहर सोडून इतर मतदारसंघात ७५० कोटींची कामे सुरू आहेत.

इतकी विकासकामे करूनही बारामतीमध्ये हरलो. कामे करूनही पराभव झाला. आता बारामतीवासीयांना दुसरा आमदार मिळाला तर, माझ्या आणि त्याच्या कामाची तुलना करा. रोखठोक बोलणारा म्हणून माझी ओळख आहे. बारामती शहर किंवा गाव असो आपण त्या ठिकाणी विकास करत आहोत. विकासाच्या कामाला प्राधान्य कसे देता येईल हे आपण पाहिले पाहिजे. शेवटी निर्णय मीच घेतो. निर्णय घेताना काही लोकांचं मत जाणून घेतले तर फायदा होतो.

कार्यकर्त्यांच्या जोरावर पक्ष चालतो हे मला माहिती आहे. कार्यकर्ता हाच पक्षाचा कणा असतो. कार्यकर्त्यांनी काम केले नाहीतर गडबड होते हे मान्य केले पाहिजे.

दरम्यान राज्यात लवकरच विधानसभा निवडणूक होणार आहे. महायुतीमध्ये सामील होऊन उपमुख्यमंत्री झालेले अजित पवार यंदा बारामतीमधून निवडणूक लढणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष आहे. आजच्या मेळाव्यातील भाषणामुळे अजित पवार कदाचित बारामतीमधून निवडणूक लढवणार नसल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यांचे पुत्र पार्थ किंवा जय पवार यांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे. लोकसभेत सुनेत्रा पवारांचा पराभव हा अजित पवारांना जिव्हारी लागला आहे. विकास कामे करून देखील बारामतीत हरलो असे वक्तव्य त्यांनी आज केले. त्यामुळे राजकीय वर्तुळात नवीन चर्चांना उधाण आले आहे.

## मराठा आरक्षणाबाबत सुप्रीम कोर्टाने दिली निर्णयाची तारीख

**मुंबई :** राज्यामध्ये अनेक दिवसांपासून मराठा आरक्षण हा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. मागील एक वर्षापासून मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणासाठी उपोषण, आंदोलनं केली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री काळातील सरकारमध्ये मराठा आरक्षणासाठी प्रयत्न करण्यात आले होते. हाय कोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर सुप्रीम कोर्टाने ते फेटाळले होते. तेव्हा आरक्षण सुप्रीम कोर्टात टिकलं नव्हतं. सुप्रीम कोर्टाच्या निकालावर पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली होती. याच याचिकेबाबत आता मोठी बातमी समोर येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या याचिकेवर सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरु आहे. आता या याचिकेच्या अंतिम सुनावणीची वेळ जवळ आली आहे.

आगामी विधानसभा निवडणूकीमध्ये मराठा आरक्षण हा मुद्दा महत्त्वाचा ठरणार आहे. लोकसभा निवड़णूकीप्रमाणे विधानसभा निवडणूकीवर देखील याचा परिमाण होणार आहे. आता मराठा आरक्षणाबाबत एक सकारात्मक पाऊल पडत असल्याचे दिसत आहे. आरक्षणाच्या याचिकेवर पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली होती. आता या सुनावणीची तारीख समोर आली आहे. निवडणूकांच्या तोंडावर सकारात्मक निकाल आल्यास महायुतीच्या बाजूने ऐतिहासिक आणि मोठा निर्णय जाहीर होईल. याचा महायुतीसह भाजपला मोठा फायदा होणार आहे.

मराठा समन्वयक विनोद पाटील यांनी याबाबत अधिकची माहिती दिली आहे. ते म्हणाले आहेत की, सुप्रीम कोर्टाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर मी आणि राज्य सरकारच्या वतीने सुप्रीम कोर्टात क्युरेटिव्ह पिटीशन दाखल करण्यात आली होती. अनेक दिवसांपासून सुनावणी सुरु असली तरी न्याय अद्याप मिळालेला नाही.



### या तारखेला होणार सुनावणी

**मराठा आरक्षणाच्या पुनर्विचार याचिकेवर पुन्हा सुनावणी होणार आहे. पुनर्विचार याचिकेवर येत्या दोन दिवसांमध्ये सुनावणी होणार आहे. सुप्रीम कोर्टाकडून ११ सप्टेंबर ही तारीख देण्यात आली आहे. त्यामुळे या याचिकेवर येत्या ११ सप्टेंबरला अंतिम निर्णय येण्याची शक्यता आहे. मराठा समन्वयक विनोद पाटील यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. विनोद पाटील यांच्याच वतीने सुप्रीम कोर्टात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे आता मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

## कोकणात जाणाऱ्या एसटी टोलसाठी रोखल्याने आनेवाडीजवळ तणाव

**सातारा :** पुणे-बंगळूर महामार्गावर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या एसटी बसना राज्य शासनाने पथकरात सवलत दिलेली आहे. मध्यरात्री कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांच्या सुमारे पन्नास एसटी बस साताऱ्यातील आनेवाडी टोल नाक्यावर पथकरासाठी रोखण्यात आल्या. वाहक-चालकांनी पथकर देणार नसल्याचा पवित्रा घेतला. त्यावरून वादावादी होऊन तणाव निर्माण झाला. महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या. सुमारे तासभर हा प्रकार सुरू होता.

दरम्यान, भुईंज पोलीस निरीक्षक रमेश गर्जे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी टोल नाका प्रशासनाशी चर्चा करून बस मार्गस्थ केल्या. त्यामुळे अखेर तणाव निवळला. आनेवाडी टोलनाक्यावरील सर्व मार्गिकेवर एसटी बस अडवण्यात आल्याने मध्यरात्रीच्या सुमारास तणाव निर्माण झाला. शेकडो वाहने मध्यरात्री पुणे-सातारा मार्गिकेवर अडकून पडली. त्यामुळे मोठा गोंधळ झाला.

कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या खासगी मोटारी, एसटी बस तसेच इतर वाहनांसाठी महामार्गावरील सर्वच पथकरामधून राज्य शासनाकडून सूट देण्यात आली आहे. कोकणातील मार्गावर झालेली वाहनांची कोंडी, गर्दी आणि खराब रस्त्यांमुळे बहुसंख्य प्रवाशांनी पुणे कोल्हापूर मार्गे कोकणात जाणे पसंत केले आहे. यामुळे गेल्या दोन दिवसांपासून पुणे बंगळुरू महामार्गावर कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या वाहनांची मोठी गर्दी आहे. या वाहनांनाच काल मध्यरात्री साताऱ्याजवळील आनेवाडी टोल नाक्यावर पथकरासाठी अडवल्याने एकच गोंधळ उडाला.



मुंबई, पुण्याच्या बाजूकडून आलेल्या एसटी बस कोल्हापूर, कराडवरून खाली कोकणच्या दिशेने जाणार होत्या. या बस आनेवाडी टोल नाक्यावर रात्री आल्या. कर्मचाऱ्यांनी चालकांकडे टोलची मागणी केली असता, वाहक व चालकांनी कोकणात जाणाऱ्या या बस असून, टोलमाफी असल्याचे सांगितले. मात्र, टोल प्रशासनाने शासनाकडून आम्हाला कोणताही आदेश आला नसल्याचे सांगून टोलशिवाय जाऊ देणार नसल्याची भूमिका घेतली. दोन्ही बाजूंनी कडक भूमिका घेतल्याने तणावाची स्थिती निर्माण झाली. टोलनाक्यावरील सर्वच मार्गिकेवर या एसटी बस थांबल्या होत्या.

त्यांच्या मागे अन्य वाहने अडकून पडल्याने महामार्गावर कोंडी झाली होती. एसटीतील प्रवाशांनी आक्रमक होऊन वाद घालायला सुरुवात केली. त्यामुळे तणावात भर पडली. एकच गोंधळ उडाला. अखेर हे प्रकरण भुईंज पोलीस ठाण्यापर्यंत गेले. त्यांनी टोल नाका प्रशासनाशी चर्चा करून बस मार्गस्थ केल्याने अखेर तणाव निवळला.

# गौरीच्या आगमनासाठी महिलांची लगबग

**सातारा :** सातारा शहर परिसरात यावर्षी गणरायाचे काल दिमाखदार आगमन झाले, आता सर्व महिलांना वेध लागले आहे ते मंगळवारी येणाऱ्या गणपतीच्या बहिणी ज्येष्ठा व कनिष्ठा गौरीच्या स्वागताचे. यासाठी सातारा शहरातील सदाशिव पेठ , खणआळी, मोठी चौक परिसर विविध विक्रेत्यांच्या साहित्याने सजवून गेला असून ही साहित्य खरेदी करण्यासाठी महिलांचाही तितकाच उत्साह दिसत आहे .गौरीना लागणारे विविध दाग- दागिने खरेदीसाठी तसेच गौरीपुढे मांडण्यात येणाऱ्या विविध फराळाचे पदार्थाचे खरेदीसाठी महिलांची धांदल उडाली आहे. यामुळे रस्ते महिलांच्या गर्दीने फुलून गेले आहेत ,

काही वर्षांपर्यंत महिला घरोघरी फराळाचे पदार्थ करून ते गौरीपुढे मांडत असतात .मात्र सध्याच्या धावपळीच्या युगामध्ये विविध तिखट आणि गोड प्रकारचे फराळाचे पदार्थ महिला या छोट्या स्वरूपात पॅकेट वजा तयार मिठाई विक्रेत्यांकडून खरेदी करून त्या गौरीपुढे मांडण्याचा कल वाढीस लागला आहे, त्यामुळे असे विविध खाद्यपदार्थ आणि फराळाचे पदार्थ असणारे स्टॉल सध्या खण आळी आणि सदाशिव पेठ मध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहेत यामध्ये लाडू, चिवडा ,बर्फी, म्हैसूर पाक ,बालुशाही ,सुतरफेणी विविध प्रकारचे माव्याचे मोदक ,अंबा बर्फी ,कलाकंद, गुलाबजाम ,लसूण शेव, तिखट शेव, पालक शेव, भावनगरी, गाठी, साखरगाठी ,गोड शेव आधी प्रकार येथे पॅकेट स्वरूपात बनवून विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत .सर्वात कमी वजनाच्या असे वीस रुपयाचे प्रत्येकी एक नग असे पाकीट महिला खरेदी करताना दिसत असून गौरीपुढे या फराळाची डिश सजवण्यामध्ये एक विशेष उत्साह दिसून येतो.

अनेक गणेश मंडळांनी गौरी पुढे मांडण्यात येणाऱ्या पदार्थांच्या सजावट स्पर्धा ही आयोजित केल्या असून त्यालाही महिलांचा विशेष उत्साह आणि नोंदणीसाठी प्रतिसाद मिळत आहे. सध्या उत्सवामुळे शेवंती, गुलाब, निशिगंध, झेंडू या फुलांनाही मोठी मागणी असून फुलांची कमतरता पडत असल्यामुळे कृत्रिम फुलांचे गुच्छ खरेदी करतानाही महिलांची विशेष गर्दी दिसत आहे .





फोटा : अतुल देशपांडे, सातारा

# स्त्रीचे विचारविश्व

लहानपणापासून स्त्रीचे विचारविश्व लग्न लवकर, 'वेळे'वर होणे याभोवती फिरवत ठेवले जाते आणि पर्याय नसल्याने तिला ते पटते; तेव्हा ती 'वेळ'च कायद्याने बदलणे इष्ट...

हिमाचल प्रदेश विधानसभेने संमत केलेल्या बालविवाह सुधारणा कायद्याचे स्वागत करताना १५० वर्षांचा इतिहासही आठवून, समाजाची गती लक्षात येते

स्त्रियांवरील अत्याचाराच्या क्रूर आणि तितक्याच करुण घटनांनी भारतीय समाजमानस व्यापून टाकलेले असताना हिमाचल प्रदेश विधानसभेने स्त्रियांच्या लग्नाचे वय १८ वरून २१ करण्याचे अत्यंत महत्त्वाचे विधेयक संमत करणे ही खरे तर तलखीमध्ये झुळूक यावी अशीच घटना. काँग्रेस आणि भाजप या दोघांच्या एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या राजकारणामधून ती घडणे आणि त्यातून हिमाचल प्रदेशमधील का होईना स्त्रीवर्गाचे भले होणे यापेक्षा लोकशाही प्रक्रिया आणखी वेगळी काय असते? हे विधेयक काँग्रेसने आणले असले आणि बहुमतामुळे संमत करून घेतले असले तरी आम्हीच ते आधी आणले होते, तांत्रिकदृष्ट्या आमचेच विधेयक पुढे नेले गेले आहे, अशी भूमिका प्रदेश भाजपने घेतली आहे. त्यामुळे आता तेथील राज्यपालांनी ते अडवून ठेवणे वगैरे इतर राज्यांमध्ये इतर विधेयकांबाबत घडल्या तशा गोष्टी कदाचित या विधेयकाबाबत घडणार नाहीत, अशी आशा आहे.

वास्तविक २०२१ मध्ये स्त्रियांचे विवाहाचे वय २१ करण्याचे विधेयक संसदेत मांडले गेले होते, पण भाजपकडे पाशवी बहुमत असूनही ते स्थायी समितीकडे गेले आणि थंड्या बासनात पडले. स्त्रियांचे जगणे बदलण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकणाऱ्या या विधेयकाचे स्वागत आणि इतर राज्यांनाही असे विधेयक आणण्याची बुद्धी व्हावी अशी अपेक्षा.

राज्यातील सर्व धर्मांच्या मुलींचे विवाहाचे वय यापुढे २१ वर्षे असेल हा कायदा करणारे हिमाचल प्रदेश हे देशातले पहिलेच राज्य ठरले असून 'हिमाचल प्रदेश बाल विवाह प्रतिबंध विधेयक- २०२४'मध्ये हा बदल करण्यात आला आहे. विवाह हा विषय समावर्ती यादीत असल्यामुळे राज्ये या प्रकारचा कायदा करू शकतात. स्त्री-पुरुष समानतेला चालना देणे, स्त्रियांचे आरोग्य चांगले राखणे आणि त्यांना शिक्षणाच्या तसेच आयुष्य घडवण्याच्या संधींचा लाभ घेऊ देणे हा या विधेयकामागचा उद्देश असल्याचे हिमाचली सरकारचे म्हणणे. अर्थात कायद्याचा परिणाम झिरपण्यासाठी काही काळ जावा लागतो, तशी याहीसाठी वाट पाहावी लागेल. पण स्त्रियांच्या लग्नाचे वय हा मुद्दा अगदी ब्रिटिश काळापासून राजकीय- सामाजिक चर्चेचा विषय ठरला आहे, आणि त्याने गेल्या १००-२०० वर्षांमध्ये स्त्रियांच्या जगण्यात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत, हे नाकारता येत नाही. राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नांचा रेटा आणि ब्रिटिशांचा हस्तक्षेप यांमुळे १८२९ मध्ये सतीप्रथा बेकायदा ठरली.

भारतातील पहिल्या महिला डॉक्टर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रखमाबाई राऊत यांनी तर 'मला मान्य नसलेल्या लग्नात मी नांदणार नाही,' अशी ठाम भूमिका घेऊन न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. महाराणी व्हिक्टोरियापर्यंत जाऊन दाद मागितली. एक स्त्री नवऱ्याबरोबर नांदायला नकार देते यामुळे त्या काळात समाजात किती खळबळ माजली असेल, हे त्या काळातील लोकमान्य टिळक आदींच्या त्या काळातील प्रतिक्रियांवरून दिसते. याच काळात बंगालमध्ये फूलमणी दासी या दहा वर्षांच्या मुलीचा लग्नाच्या पहिल्याच रात्री लादल्या गेलेल्या लैंगिक संबंधांमुळे मृत्यू झाला होता. तिची आई या प्रकरणी न्यायालयात गेली होती. या दोन्ही प्रकरणांमुळे निर्माण झालेला रेटा, घोर सामाजिक वादविवाद, न्यायालयीन प्रक्रिया यांचा परिणाम म्हणजे १८ मार्च १८९१ रोजी संमतिवयाचा कायदा लागू झाला. या कायद्याने मुलीचे लग्नाचे वय दहावरून १२ करण्यात आले. 'ब्रिटिशांचा आमच्या धार्मिक गोष्टींत हस्तक्षेप नको' असे म्हणणाऱ्या बहुसंख्य समाजात हा कायदा होणे ही खूप मोठी गोष्ट होती. त्यानंतर राजस्थानमधील एक पुरोगामी न्यायाधीश हरविलास शारदा यांच्या प्रयत्नांमुळे १९२९ मध्ये बालविवाह प्रतिबंध कायदा करण्यात आला. तो 'शारदा कायदा' या नावानेही ओळखला जातो. त्यानुसार मुलीचे लग्नाचे वय १४ वर्षे करण्यात आले. त्यानंतरचा बालविवाह प्रतिबंध (सुधारणा) कायदा होऊन स्त्रियांचे लग्नाचे वय १८ वर्षे करण्यासाठी १९७८ साल उजाडावे लागले. या कायद्याने १८ वर्षांखालील वयाच्या मुलीशी शरीरसंबंध हा कायद्याने बलात्कार मानला गेला.

स्त्रियांचे लग्नाचे वय निश्चित होण्यामागे ही दीडेकशे वर्षांची पार्श्वभूमी आहे. त्या त्या काळातील संवेदनशील पुरुषांचा या प्रक्रियेला मोठा हातभार लागला आहे. आजघडीला बालविवाह होत नाहीत, असे कुणीही छातीठोकपणे म्हणू शकत नसले तरीदेखील, किमान शहरी भागांत उघडपणे होत नाहीत, अगदीच नवव्या-दहाव्या वर्षी होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. आजही तिची संमती विचारात घेतली जातेच, असे ठामपणे म्हणता येत नाही. पण मुलीचे आरोग्य, तिचे थोडेफार का होईना शिक्षण होणे हे मुद्दे तिला वाढवताना काही प्रमाणात तरी महत्त्वाचे ठरतात.

सामाजिक दबाव थोडाफार का होईना विचारात घ्यावा लागतो. हे सगळेच घडू शकले ते गेल्या १५० वर्षांमधल्या सामाजिक सुधारणांच्या रेट्यामुळे, त्यातून झालेल्या कायदेबदलांमुळे. या पार्श्वभूमीवर हिमाचल प्रदेशमध्ये मुलीच्या लग्नाचे वय १८ वरून २१ करण्याचे महत्त्व लक्षात घ्यायला हवे.

मुलगी हे 'ओझे', 'परक्याचे धन' मानणारा समाज अगदी आजही हे ओझे ज्याचे त्याला लवकरात लवकर देऊन टाकण्यात धन्यता मानतो. त्यामुळे मुलगी जन्माला आल्यापासूनच तिच्या लग्नाची चर्चा सुरू होते. तिला नीट शिक्षण देणे, स्वावलंबी व्यक्ती बनवणे हा 'आधुनिक' विचार आजही अनेकांना झेपत नाही. ग्रामीण भागात, विशिष्ट जाती-धर्मांमध्ये तर हे मुद्दे आणखीनच जटिल होतात. मुलीला काय हवे आहे, तिला लग्न करायचे आहे की नाही, याचा विचार न करताच कुटुंबाची इच्छा म्हणून, प्रतिष्ठा म्हणून तिच्यावर लग्न लादले जाते. आपोआपच बाळंतपणेही लादली जातात. मुळात स्वतंत्र, समर्थ, सक्षम व्यक्ती बनण्याचे असे काही स्वप्न असते, आपल्या आवडीच्या एखाद्या गोष्टीसाठी आयुष्य झोकून देता येते, द्यायचे असते हे तिच्यापर्यंत पोहोचूच दिले जात नाही. लहानपणापासून तिचे विचारविश्वच लग्न लवकर, वेळेवर होणे याभोवती फिरवत ठेवले जाते. ते बरोबरच आहे, असे तिलाही वाटणे हे लग्नव्यवस्थेचे यशच म्हणायला हवे. त्यामुळे ती 'वेळ'च कायद्याने लांबवणे हा स्त्री सक्षमीकरणाचा खरा, चांगला मार्ग

महात्मा फुले, आगरकर, महर्षी कर्वे, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्यासारख्यांचे प्रयत्न, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, त्यासाठी कुटुंबाने दिलेला भक्कम पाठिंबा या सगळ्याच्या बळावर हे सक्षमीकरण अनेक स्त्रियांनी मिळवले आहे. पण आपल्या लोकसंख्येचे प्रमाणच एवढे प्रचंड आहे, की आकडेवारीच्या खेळात हे प्रमाणही नगण्यच वाटावे. मात्र ते आहे आणि दिलासादायक आहे, हे महत्त्वाचे. एवढेच नाही तर आपल्या इच्छा-आकांक्षा, आपला विकास या सगळ्याच्या आड येणारे लग्नच आम्हाला नको, अशी ठाम भूमिका घेणाऱ्या पाच-पन्नास जणीही आसपास दिसू लागल्या आहेत. लग्न आणि लैंगिक संबंध यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही, मूल जन्माला घालणे, आई होणे ही काही आमची गरज नाही अशा स्वच्छ भूमिका घेऊन जगणाऱ्या या स्त्रियांचा हा आवेग उद्याच्या कायद्याला तरी पेलवणार आहे का, असाच प्रश्न त्यातून उपस्थित होऊ शकतो, ही वेगळी गोष्ट. त्यांना लग्नव्यवस्थेला नकार द्यायचा नाही, तर स्वतःच्या संमतीला प्राधान्य द्यायचे आहे, हे अधिक महत्त्वाचे आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. 'संमतिवयाच्या कायद्या'ला यापेक्षा वेगळे काय अपेक्षित होते?

## साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीरच्या देखाव्यात १८ संतांच्या पादुकांचे दर्शन

पुणे : साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीरच्या सार्वजनिक गणेशोत्सवात १८ संतांच्या पादुका दर्शन सोहळा हा देखावा करण्यात आला आहे. तसेच श्री सद्गुरू शंकर महाराज मठाची प्रतिकृति उभारण्यात आली आहे.या देखाव्याचे आणि प्रतिकृतीचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योजक पुनित बालन यांच्या हस्ते सोमवार,दि.९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. रवींद्र माळवदकर (अध्यक्ष, साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीर),भाई कात्रे (कार्यअध्यक्ष साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीर) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.संत ज्ञानेश्वर, मुकताबाई,नामदेव,जनाबाई,नरहरी सोनार,सेनामहाराज,निळोबाराय,रामदास,वेणाबाई,महावतार,स्वामी समर्थ, टेम्बे स्वामी,शंकर महाराज,गुळवणी महाराज यांच्या पादुकांच्या प्रतिकृती मांडण्यात आल्या आहेत. दि.९ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर या कालावधीत दररोज एक संत याप्रमाणे श्री साईबाबा,जंगली महाराज,अक्कलकोट स्वामी समर्थ,माळी महाराज,गजानन महाराज तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूळ पादुका देखील दर्शनासाठी मांडण्यात येत आहेत.१९१९ साली स्थापन झालेल्या साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीरला १०५ वर्षांची परंपरा आहे.राष्ट्रीय एकात्मता प्रसारासाठी ही संस्था प्रयत्न करते.

## आळंदी येथील शिवसेना पक्ष कार्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्री : एकनाथ शिंदे

**आळंदी / पुणे :** श्रीक्षेत्र आळंदी येथील शिवसेना मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय, आळंदी शहर जनसंपर्क कार्यालय शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, आळंदी शहर

भव्य उद्घाटन दि.८ रोजी देहू फाटा, शांती होंडा शोरूम समोर, आळंदी

मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी श्री दादासाहेब भुसे सार्वजनिक बांधकाम मंत्री, श्री इरफान भाई सय्यद शिवसेना उपनेते, श्री भगवान शेठ पोखरकर शिवसेना पुणे जिल्हा प्रमुख, श्री शिवाजीराव आढळराव पाटील माजी खासदार, श्री नितीन शेठ गोरे सदस्य महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ,श्री अक्षय जाधव शिवसेना पुणे जिल्हा संघटक , श्री निलेश पवार शिवसेना पुणे जिल्हा संघटक, प्रकाश वाडेकर मा. शिवसेना तालुका प्रमुख अक्षय महाराज भोसले श्री निलेश आढळराव, श्री सचिन गिलबिले, श्री दिनेश घुले, ड. सचिन काळे, श्री हनुमंत चव्हाण, श्री योगेश तळेकर, श्री सचिन तळेकर, श्री राहुल थोरवे, श्री योगेश पगडे, श्री शिवाजी पगडे, श्री बाबा



पाटोळे,ह भ प श्री विलास तात्या बालवडकर, ह भ प श्री मोहन महाराज शिंदे, ज्ञानेश्वर गारकर, विनायक महामुनी, नितीन ननवरे , राजेंद्र जाधव,सचिन शिंदे, किशोर देशपांडे, निवृत्ती मुरकुटे,ज्ञानेश्वर घुंडरे, शशिकांत बाबर,ह भ प माऊली महाराज पडघन, श्री रोहिदास कदम, ह भ प श्री संदीप नगरे, ह भ प ताई माऊली महाराज,सौ संगीता चव्हाण, सौ सोनाली शिंदे, सौ अश्विनी ननवरे, सायरा शेख,संगिता दाभाडे

,सरस्वती खोडसे,शारदा घनघाव,महेक शेख,बबिता शिंदे भाग्यश्री गावडे,श्रीदेवी बिराजदार,पुजा घनघाव,मिनाक्षी वाडेकर,अनूराधा जाधव व श्रीरामकृष्ण वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी व पंचक्रोशीतील हजारो नागरिक महिला उपस्थित होते

## कॅन्सरशी लढा देणाऱ्यांसाठी क्रांतिकारी उपक्रम



**मुंबई** :कॅन्सरशी लढा देणाऱ्यांसाठी क्रांतिकारी उपक्रम म्हणून, नवी मुंबईतील खारघर येथे मेडिकोव्हर हॉस्पिटल्सने केमोथेरपी घेत असलेल्या रुग्णांसाठी सुरक्षित सुविधा देण्यासाठी डिझाइन केलेला एक केमो डे केअर वॉर्ड सुरू केला आहे. एकाच वेळी १५ केमोथेरपी उपचार अत्याधुनिक उपकरणांनी घेण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते या विभागाचे उद्घाटन करण्यात आले. रुग्णांना केमोथेरपी उपचार घेण्यासाठी आणि त्याच दिवशी घरी परतण्यासाठी केमो डे वॉर्डची स्थापना करून हॉस्पिटल ने एक अभिनव उपाय आणला आहे असे मंगेश चिवटे यावेळी म्हणाले. कर्करोग केमो उपचारादरम्यान जास्त केस गळती होत असते. ते टाळण्यासाठी रुग्णांना केमो टोपी घालून उपचार करण्यात येणार आहेत अशी माहिती सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ डोनाल्ड जॉन यांनी यावेळी दिली.

# धनकवडीत ११ गणेश मंडळांची संयुक्त अनोखी मिरवणूक

### आदिवासींचे पारंपरिक नृत्य आणि संगीताने गणेश भक्त तल्लीन : पुणे सहित संपूर्ण जगभर चर्चा

**पुणे, :** लोकनृत्य हा आपल्या संस्कृतीचा एक भाग आहे, जो कोणत्याही समाजाची विविध रूपे दाखवतो, यातून समाजातील परंपरा समजून घेता येतात. अशात धनकवडीतील ११ गणेश मंडळांच्या संयुक्त मिरवणुकीची चर्चा पुणे सहित संपूर्ण जगभर पोहचली आहे. 'आदिवासी युनिव्हर्सल ट्रॅबल' या संस्थेकडून शहरात प्रथमच गणेश आगमनाच्या वेळी आदिवासी संस्कृतीची झलक पहावयास मिळाली. यात आदिवासी नृत्य आणि संगीताला समर्पित करण्यात आली. यांच्या पारंपारिक नृत्य आणि संगीताने गणेश भक्तांना मंत्रमुग्ध केले.

तत्पपूर्वी स्थानीक आमदार भीमराव तापकीर, विशाल तांबे, नगरसेविका वर्षाताई तापकीर, बाळासाहेब धनकवडे, अनिल भोसले, ११ गणेश मंडळांचे अध्यक्ष, मंडळांचे अध्यक्ष संतोष धनकवडे, अभिषेक तापकीर, उदय जगताप , ,विजय क्षीरसागर,प्रतिक कुंभार, रुपेश रणावरे, आनंद शिंदे आणि विश्वस्त अनिरुद्ध येवले यांच्या हस्ते गणेश पूजा करण्यात आली.







संयुक्त मिरवणुकीचा नवा पायंडा घालाणार्या एकत्रित सार्वजनिक मिरवणुकीत धनकवडी येथील साईनाथ मित्र मंडळ, श्री शिव छत्रपती मित्र मंडळ, आदर्श मित्र मंडळ, फाईव्ह स्टार मित्र मंडळ, केशव मित्र मंडळ, जय महाराष्ट्र मंडळ, अखिल नरवीर तानाजी नगर मित्र मंडळ, एकता मित्र मंडळ, विद्यानगरी मित्र मंडळ, रामकृष्ण मित्र मंडळ आणि अखिल मोहन मित्र मंडळ यांच्या सारख्या ११ गणेश मंडळांनी मोठ्या संख्येने एकत्रित येऊन देशातील सर्वात मोठ्या एकत्रित मिरवणुक काढली. आदिवासी सांस्कृतिक जतन रथात ११ गणेश मंडळाचे गणपती विराजमान झाले होते. ही मिरवणुक दुपारी १२.३० वा. गुलाबनगर, धनकवडी येथून काढण्यात आली. त्यानंतर धनकवडी गाव, केशव कॉम्प्लेक्स, विद्यानगरी शिवशंकर चौक ते मोहननगर येथे पोहचली. या मिरवणुकीत जवळपास १० हजार गणेश भक्त सहभागी झाले होते.

ज्ञानप्रबोधिनी वाद्य आणि गोविंदा बँड पथक यांच्या ढोल ताशांनी संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. पालघर आणि गडचिरोली येथील आदिवासी नृत्यामध्ये शिकार कलेचे दर्शन घडविणार्या नृत्याने बाप्पाच्या आगमनाची सुरूवात झाली. वाघाची वेशभूषा परिधान केलेल्या कलाकारांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. याच क्रमात महिला व पुरूषांची नृत्य झाले. ज्याची लोकप्रियता सध्या संपूर्ण जिल्ह्यात पाहायला मिळत आहे. कलाकारांनी या पारंपारिक नृत्यांना सांस्कृतिक चव जोडून मनमोहक बनवले. या मध्ये धार्मिक, आध्यात्मिक आणि पौराणिक कथा जिवंत केल्या.

मुख्यावट्याऐवजी, कलाकारांनी प्रत्येक पात्राला वेगळी ओळख देण्यासाठी चमकदार रंगांचा वापर केला, तर हात पायांची चपळता आणि चेहर्यावरील हावभाव गणेश भक्तांच्या टाळ्या मिळवत होते.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# कुसूर येथे संशयास्पद मृत्यू झालेल्या व्यावसायिकाचा खून झाल्याचे उघडकीस

## पोलिसांना शवविच्छेदन अहवाल प्राप्त : धारदार शस्त्राचा वापर

**कराड :** ता. कराड येथे राहत्या घरातून बेपत्ता झालेल्या व्यावसायीकाचा मृतदेह गुरूवारी संशयास्पद स्थितीत आढळून आला होता. याप्रकरणी अकस्मात मयत अशी नोंद करून कराड ग्रामीण पोलिसांकडून तपास सुरू असताना संबंधिताचा अज्ञातांनी धारदार शस्त्राने वार करुन खून केल्याचे स्पष्ट झाले आहे. शवविच्छेदन अहवालातून ही बाब समोर आली आहे. त्यामुळे पोलिसांनी अज्ञातांवर खुनाचा गुन्हा दाखल करुन त्यांच्या शोधासाठी तपास पथके रवाना केली असल्याची माहिती कराड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांनी दिली.

शिवाजी लक्ष्मण सावंत (वय ५२, रा. कुसुर) असे खून झालेल्याचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, कुसूर येथील शिवाजी सावंत हे किराणा दुकानदार होते. गावात ते त्यांचा भाऊ बाळासाहेब तसेच इतर कुटुंबीयांसमवेत वास्तव्यास होते.

# क्लीनरचा खून करून ड्रायव्हर फरार

## नवी मुंबई ते पिंपोडे बुद्रुक प्रवासादरम्यानची घटना

**पिंपोडे बुद्रुक :** मुंबईवरून पिंपोडेकडे मालाचा टेम्पो घेऊन येत असताना ड्रायव्हरने क्लीनरला मारहाण करून खून केल्याची घटना घडली. अविनाश सुरेश शिंदे (वय १९) रा. शाळगाव, ता. कडेगाव, जि. सांगली असे मृत क्लीनरचे नाव आहे.

वाठार पोलिसांनी दिलेल्या, माहितीनुसार पिंपोडे बुद्रुक येथील कृष्णात शामराव लेंभे यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून त्यांचा टेम्पो क्रं. एम. एच. ११ डी. डी. ८८५० हा गुरुवार दि. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ९ वाजता महापे नवी मुंबईवरून केरळ कडे माल भरून निघाला होता. या गाडीचा चालक मिथुन सर्जेराव शिंदे, रा. गणेशवाडी ता. सातारा, जि. सातारा व क्लीनर मयत अविनाश शिंदे हे दोघे गाडी घेऊन येत होते. मुंबई ते पिंपोडे या प्रवासादरम्यान चालक मिथुन शिंदे याने क्लीनर अविनाश याला मारहाण करून ठार केले. व रात्रीच्या सुमारास मृतदेहासह गाडी पिंपोडे बुद्रुक येथील गाडी मालक कृष्णात लेंभे यांच्या घरासमोर लावून फरार झाला. घटना सकाळी गाडीचे दार उघडल्यानंतर लेंभे यांच्या लक्षात आली. घटनेची फिर्याद कृष्णात लेंभे यांनी आज शनिवार दि, ७ रोजी वाठार पोलीस ठाण्यात दिली असून तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश माने करीत आहेत.

# नागठाणे येथे महिलेचा खून

**सातारा :** दारुच्या नशेत भांडण झाल्याने एकाने महिलेचा खून केला. ही घटना दि. ५ रोजी रात्री ८.३० च्या सुमारास नागठाणे, ता. सातारा गावच्या हद्दीत बावडीवर ऑईल मिलच्या शेजारी घडली.

श्रीमती कोरीमशीन शौकत भोसले, वय ३९, रा. बेघरवस्ती असे मृत महिलेचे नाव असून, राहूल ऊर्फ शेऱ्या प्रकाश चव्हाण, वय ३५, रा. लिंब, ता. सातारा असे संशयित आरोपीचे नाव आहे. जानवर शौकत भोसले, वय २३,. रा. बेघरवस्ती, नागठाणे यांनी बोरगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीत नमूद केले आहे की, कोरीमशीन भोसले ही महिला व राहूल चव्हाण हे एकत्र राहत होते. दोघांनाही दारुचे व्यसन होते. दोघांमध्ये भांडण होवून राहूल चव्हाण याने तिच्या चेहरा, डोके, कान तसेच शरिरावर ठिकठिकाणी मारहाण केली. त्यात कोरीमशीन यांचा मृत्यू झाला. पोलीस नाईक शिंदे तपास करत आहेत.

# साताऱ्यातील क्रिकेट स्टेडियम वेटिंगवरच

**सातारा :** साताऱ्यामध्ये क्रिकेटवरुन मोठे राजकारण रंगले असल्याचे दिसून येत आहे. अफजल पठाण, महेश कारंजकर, योगेश दोशी, रोहन भोसले असे रणजीपटू देणाऱ्या सातारा जिल्ह्यातील क्रिकेटची दयनीय अवस्था झाली आहे.खेळासाठी मैदान उपलब्ध नसल्याने जुने जाणते आजी माजी खेळाडू जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे नामधारी पदाधिकारी होऊन बसले आहेत. जिल्ह्यातील क्रिकेटच्या वाढीसाठी ठोस काही होण्याची चिन्हे दिसेनाशी झाली असून लगतचा कोल्हापूर जिल्हा याबाबतीत कमालीचा जागरूक असल्याने नुकतीच आंतरराष्ट्रीय स्टेडियमची मान्यता मिळविण्यात यशस्वी झाला आहे.


प्रतिकात्मक

अनेक महत्त्वाच्या पदांवर कर्तव्यदक्ष आणि कार्यतत्पर व्यक्ती बसल्यास सकारात्मक बाबी आपोआप घडत असतात सातारा जिल्ह्यातील खेळाडूंना सराव करण्यासाठी मैदान उपलब्ध नाही ही समस्या छत्रपती शाहू स्टेडियमच्या नूतनीकरणास सुरुवात झाल्यानंतर सुरू झाली सुमारे १५ वर्षांचा कालखंड लोटल्यानंतर आजही क्रिकेटचे सामन्यांनासाठी नगरपालिकेचे क्रिकेटसाठी स्वतःचे मैदान उपलब्ध नाही ही फार मोठी शोकांतिका असल्याची खंत खेळाडू व्यक्त करीत आहेत.

करार झाला पण छत्रपती शाहू स्टेडियम हे नूतनीकरण करण्यापूर्वी जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या क्रिकेट सामन्यासाठी वापरले जात होते.मैदानाच्या मध्यभागी टर्फ (हिरवीगार गवताळ खेळपट्टी) तीस यार्डापर्यंत पसरले होते खेळपट्टी व्यवस्थित असल्याने गोलंदाज आणि फलंदाज यांना आपला नैसर्गिक खेळ यामुळे खेळता येत होता आणि उच्च दर्जाचे क्रिकेट यामुळे दर्शकांना पाहण्यासाठी संधी मिळत होती परंतु नूतनीकरण करण्याचा करार झाला यामध्ये या ठिकाणी क्रिकेटच्या खेळासाठी सोयीसुविधा उपलब्ध होतील असेही नमूद असल्याचे मत सातारा जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव इर्शाद बागवान यांनी सांगितले आहे.परंतु नंतर कुठे माशी शिंकली याबाबतची काहीच कल्पना नसल्याची माहिती खेळाडू देत आहेत.

**सध्या क्रिकेटच्या सामन्यासाठी छत्रपती शाहू स्टेडियम हवे असल्यास दररोज पाच हजार रुपये भाडे सातारा नगरपालिकेत भरण्याची सक्ती केली जाते.एकतर मैदानाची खेळपट्टी व्यवस्थित करण्यासाठी तीस हजार रुपये खर्च येतो यावर अस्ट्रो टर्फ (कृत्रिम खेळपट्टी)आणून टाकण्याचा खर्च वेगळा करावा लागत असल्याने ही न परवडणारी बाब आहे आणि वरून दररोज पाच हजार भाडे म्हणजे म्हशीपेक्षा रेडकू मोठे असल्याची भावना खेळाडू व्यक्त करीत असल्याने खेळासाठी मैदानच नसल्याने दर्जा कसा सुधारणार असा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.**

# विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर व्हावे : सौ. चित्रलेखा माने-कदम

**रहिमतपूर :** समाजात विकृत प्रवृत्तीचे प्रमाण वाढत आहे. मुलींचे व महिलांचे प्रश्न गंभीर बनले आहेत. आपले प्रश्न आता आपणच सोडविले पाहिजेत. यासाठी मुलींनी आत्मनिर्भर व्हावे असे प्रतिपादन पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सौ. चित्रलेखा माने - कदम यांनी केले.



सरदार बाबासाहेब माने महाविद्यालयातील महिला अत्याचार प्रतिबंध समिती, महिला तक्रार निवारण समिती आणि रहिमतपूर पोलिस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'निर्भया पेटी उद्घाटन समारंभ' व 'महिला सुरक्षा प्रबोधनपर व्याख्यान अशा संयुक्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर रहिमतपूर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे, प्राचार्या डॉ सौ. भाग्यश्री जाधव, प्रा. सौ. माधुरी भोसले, प्रा. रत्नमाला शिंदे, डॉ. सौ. सुनंदा मोहिते यासह मान्यवर उपस्थित होते.

पुढे त्या म्हणाल्या की, तुमच्या आयुष्याची सोनेरी स्वप्न आई-वडीलांनी पाहिली आहेत. ती सफल व्हावीत यासाठी आई-वडील कष्ट करतात. शिक्षक शिकवितात याची जाणीव आपल्याला असायला हवी. हे वय शिकण्याचे ,करिअरचा पाया भक्कम करण्याचे असते. त्यामुळे या वयात अध्ययन करण्याचे काम करायला हवे. आपल्या सभोवताली समाजात जे काही घडते आहे याबाबत सजग राहायला हवे. आपल्या जिल्ह्यात जिल्हा पोलिस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस यंत्रणा चांगले काम करीत आहे.

# दगडूशेठ' गणपतीसमोर ३५ हजार महिलांचे अथर्वशीर्ष पठण


गणेश नामाचा गजर करताना प्रत्येक महिलेच्या चेह-यावरील उत्साह ओसंडून वाहत होता

ओम गं गणपतये नम...! दगडूशेठ' गणपतीसमोर ३५ हजार महिलांचे अथर्वशीर्ष पठणपुणे : ओम नमस्ते गणपतये... ओम गं गणपतये नमः:... मोरया, मोरया... च्या जयघोषाने तब्बल ३५ हजार महिलांनी एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला नमन केले. ऋषीपंचमीनिमित्त आयोजित सोहळ्यात उर्जेने भारलेल्या वातावरणामध्ये हजारोमहिलांच्यागर्दीचा उच्चांक यानिमित्ताने पहायला मिळाला. पारंपरिक वेशात मध्यरात्री १ वाजल्यापासून महिलांनी या उपक्रमाकरीता हजेरी लावण्यास सुरुवात केली. गणेश नामाचा जयघोष करीत अथर्वशीर्षासोबत महाआरती करीत महिलांनी स्त्री शक्तीचा जागर केला.

निमित्त होते, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३२ व्या वर्षी उत्सव मंडपासमोर आयोजित अथर्वशीर्ष पठण सोहळ्याचे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अरुणा ढेरे, वृषाली श्रीकांत शिंदे, ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी यांसह शुभांगी भालेराव, अर्चना भालेराव, प्रा.गौरी कुलकर्णी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिलांनी शंखनाद केल्यानंतर सोहळ्याला प्रारंभ झाला. त्यानंतर मन शांत करणारा ओंकार जप, गणेश जागर गीत आणि मुख्य अथर्वशीर्ष पठण करीत गणरायाला नमन केले. महिला हात उंचावून टाळ्यांचा गजर करीत गणरायाला नमन करीत होत्या. गणेश नामाचा गजर करताना प्रत्येक महिलेच्या चेह-यावरील उत्साह ओसंडून वाहत होता. महिला अथर्वशीर्ष पठण उपक्रमाची दखल इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्ड ने घेत डॉ. दीपक हरके यांनी ट्रस्टला प्रमाणपत्र दिले.

दगडूशेठच्या उत्सव मंडपापासून ते नाना वाडयापर्यंतच्या परिसरात महिलांनी अथर्वशीर्ष पठणाकरीता गर्दी केली. भक्तीरसात तल्लीन झालेल्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली. पुण्यासह मुंबई, लातूर, कोल्हापूर, नाशिक व महाराष्ट्राच्या विविध ठिकाणाहून आलेल्या महिलांनी उपक्रमात सहभाग घेतला. उपक्रमाचे ३९ वे वर्ष होते.

# भाजपच्या उज्वल भविष्याकरता नितीन गडकरी मैदानात

## महायुतीचे सरकार आणण्याकरता महिनाभर वेळ देणार: चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना संपूर्ण महाराष्ट्र हृदयापासून ओळखतो, त्यांच्यावर प्रेम करतो. विधानसभेत भाजपच्या विजयकरता ते आता पूर्ण ताकदीनिशी उतरतील. नितीनजींना मानणारा एक मोठा वर्ग आहे. नितीन गडकरी आमचे बडे नेते आहे. कोर ग्रुपचे प्राईम मेंबर आणि पार्लमेंटरी बोर्डचे देखील ते मेंबर आहे. परिणामी, भाजपाच्या उज्वल भविष्याकरता, महायुतीचे सरकार आणण्याकरता नितीनजी पूर्ण एक महिना देणार आहे, अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. ते नागपूर विमानतळावर आले असता ते बोलत होते.

आगामी विधानसभेच्या अनुषंगाने भाजपचं मेगा प्लॅनिंग करण्यात आल्याची माहिती हाती आली आहे. भाजपच्या वतीने पक्षातील चार दिग्गज नेत्यांवर महत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे आणि रावसाहेब दानवे या चार नेत्यांवर विधानसभेसाठीची म हत्वाची जबाबदारी असणार आहे. दरम्यान, येत्या आठवड्याभरात २० स्टार प्रचारकांची व्यवस्थापन समिती जाहीर होणार आहे. निवडणूक व्यवस्थापन समितीचे रावसाहेब दानवे पाटील हे प्रमुख संयोजक असणार आहेत. तर अनेक भाजपचे नेते यांचा यात समावेश असणार आहे. याविषयी



बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

आम्हाला मुख्यमंत्रीपदाची घाई नाही, उद्धव ठाकरे त्यासाठी रुसून बसले आहेत

राज्यात एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री आहे. पुढच्या काळात आमचं केंद्र नेतृत्व आणि राज्याचे तिन्ही नेते हे बसून महायुतीतील मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण या संदर्भात निर्णय घेतील. आम्हाला मुख्यमंत्रीपदाची घाई नाही. किंबहुना महाविकास आघाडीत मुख्यमंत्रीपदासाठी उद्धव ठाकरे रुसून बसले आहेत. त्यासाठी ते दिल्लीला गेले होते. दोन दिवस काँग्रेस नेत्याच्या घरी जाऊन बसले, शरद पवारांकडे जाऊन आले. मात्र, त्यांचे नाव कोणी जाहीर करायला तयार नाही. त्यामुळे ते काल राहुल गांधीच्या सांगलीतील कार्यक्रमाला गेले नाही. याचा अर्थ काँग्रेस आणि राष्ट्रवादी मुख्यमंत्री म्हणून त्यांचा चेहरा मान्य करायला तयार नाही. लोकसभेत त्यांचा चेहरा पुढे करून सहानुभूती मिळवली.

# अजितदादांकडून मविआच्या काळातही निधीवाटपात दुजाभाव', काँग्रेस नेत्याचा मोठा गौप्यस्फोट



संगमनेर : महाविकास आघाडी सरकारच्या काळात देखील अजित पवार निधी देताना दूजाभाव करत होते, असा मोठा गौप्यस्फोट काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केला आहे. संगमनेर शहरातील आपल्या निवासस्थानी बाळासाहेब थोरात यांनी गणरायाचे पूजन केले. बाळासाहेब थोरात यांच्या पत्नी कांचन थोरात, मुलगी जयश्री व जावई आणि नात गणरायाच्या पूजन सोहळ्यात सहभागी झाले होते. गणरायाचे विधीवत पूजन केल्यानंतर बाळासाहेब थोरात यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्ला चढवला तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला.

बाळासाहेब थोरात म्हणाले की, पाच वर्ष निधी वाटपात भेदभाव झाला. काही आमदारांना प्रचंड निधी तर काहींना निधीच नाही. पाच वर्षे भेदभाव करण्याचे काम अर्थ विभागाकडून झाले आहे. पाच वर्षे हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरतोय. महाविकास आघाडीच्या काळात आम्ही देखील तक्रार केली होती, असा गौप्यस्फोट अजित दादांच्या निधी वाटपावर बाळासाहेब थोरात यांनी केला आहे.

घर फोडण्याचे काम काही जण करत आहेत. घरात फूट पडणे समाजाला आवडत नाही, मी चूक केली, तुम्ही ती करू नका, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या कन्या व माजी जि.प. अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांच्या कथित संभाव्य बंडावर भाष्य केले होते. याबाबत विचारले असता बाळासाहेब थोरात म्हणाले की. या पाच वर्षाच्या राजकारणाची इतिहासात दुर्दैवी म्हणून नोंद होईल. राजकारणाचा स्थर घसरला आहे. पाच वर्षात कुटुंबाकुटुंबात वाद निर्माण झाले आहेत. मात्र महाराष्ट्राची जनता सुज्ञ आहे. मी आठ पंचवार्षिक पाहिल्या, पण ही पंचवार्षिक खूपच वाईट आहे. सत्तेसाठी आणि स्वत:ची कातडी वाचवण्यासाठी राजकारण सुरू आहे. महाराष्ट्रातील जनता तुम्हाला क्षमा करणार नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.


# सहकार मंत्र्यांच्या कारखान्यातच शरद पवार-अजितदादांचे कार्यकर्ते भिडले


आंबेगाव : सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या साखर कारखान्यामध्येच शरद पवार आणि अजित पवारांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आहेत. आंबेगाव तालुक्यातील पारगावमधल्या भिमाशंकर सहकारी साखर कारखान्यात हा राडा झाला आहे. मुख्य म्हणजे सहकार मंत्री असलेल्या दिलीप वळसे पाटील यांच्यासमोरच हा सगळा प्रकार घडला आहे. साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये दोन तास हा गदारोळ सुरू होता.

अजित पवार गटाचे मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याविरोधात विधानसभा निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असणारे शरद पवार गटाचे देवदत्त निकम यांचे समर्थक आक्रमक झाले होते. आम्हाला बसू दिलं नाही, मंचावर येऊ दिलं नाही. बैठकीत वळसे पाटील यांनी स्वत:चा प्रचार केला. हे सगळं घडवून आणण्यासाठी ते गुंड घेऊन आले, असा आरोप निकम यांनी केला आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेत राडा सुरू झाल्यानंतर वळसे आणि निकम यांचे कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावून गेले. खुर्च्या नाचवत हिणवू लागले. मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी शांततेचं आवाहन केलं, मात्र तरीही वाद कमी झाला नाही.

# पर्यटकांचे आकर्षण ठरलेले मसाई पठार फुलांनी बहरले

**पन्हाळा:** पन्हाळगडापासून अगदी हाकेच्या अंतरावर असणाऱ्या मसाई पठारावर आता रंगबिरंगी फुलांनी मनसोक्त उधळण केली आहे निसर्गाचा हा अविष्कार डोळे भरून पहाण्यासाठी पर्यटकांचे लोंढे आता मसाई पठाराकडे वळत आहेत .







अधून मधून पडणाऱ्या पावसाच्या सरी, दाट धुक्याची दुलई, मधुनच डोकावणारे इंद्रधनुष्य, झोंबणारा गारवा आणि जोडीला उकडलेली कणसे यामुळे पर्यटकांना हवी तशी आनंदपर्वणी आणि नेत्रसुख मिळत असल्याने पर्यटक मंडळी आधी पन्हाळा आणि नंतर मसाई पठार असा दोन्ही पर्याय निवडताना दिसत आहेत . फुलांमध्ये ड्रॉसेरा, सोनकी, तेरडा, निलीमा इत्यादी प्रकारची फुले आणि त्यांची विविधरंगी रंगसंगती आढळताना दिसत आहे . काही दुर्मिळ वनस्पती तसेच औषधी वनस्पती यांचेही अस्तित्व याठिकाणी जाणवत आहे .

जुन महिन्यापासून कोसळणाऱ्या धो धो पावसाचा आनंद घेण्यासाठी येणाऱ्या वर्षसहली च्या गर्दीने तर जुलै ऑगस्ट महिन्यात पन्हाळा पावनखिंड पद भ्रमण मोहिमांच्या साक्षीने इथला निसर्ग बहरतो.

श्रावणात कोसळणाऱ्या श्रावणसरी अंगावर झेलत उनपावसाचा खेळ पाहण्यासाठी अंगाला झोंबणारा गार वाऱ्यातही हौसी पर्यटक इथे गर्दी करतात.

सध्या या पठारावर निसर्गाचा रंगीबेरंगी आविष्कार पाहण्यासाठी गर्दी होत आहे. हिरव्यागार गवताच्या मऊ गालीच्या वर विविध प्रकारच्या रान फुलांचे रंगीबेरंगी ताटवे, वाऱ्यावर डोलताना कधी एकट्याने तर कधी समूहाने वाढणारी रानफुले पाहून आपले कविमन जागृत होते. हौसी पर्यटकां बरोबर निसर्ग अभ्यासकांसाठी पर्वणी असलेल्या या पठारावर प्रवेश करताच सोनकीच्या पिवळ्या फुलांनी आपले स्वागत होते.








# कराडला जल्लोषात गणरायाचे स्वागत

## गणेशभक्तांचा उत्साह शिगेला; सार्वजनिक मंडळाच्या आकर्षक मिरवणूका

**कराड** : गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया... अशा जयघोषात, फटाक्यांच्या आतषबाजीत कराड शहर व परिसरात शनिवारी गणरायाचे ढोल-ताशांच्या गजरात अभूतपूर्व वातावरणात जल्लोषात स्वागत करण्यात आले. ग्रामीण भागातील काही गावातील गणेश मंडळे शुक्रवारी सांयकाळीच गणरायांची मूर्ती घेऊन गेले. सार्वजनिक गणेश मंडळांनी मिरवणुका काढून आपल्या लाडक्या गणरायाची मनोभावे प्राणप्रतिष्ठापना केली. घरगुती गणेशमूर्ती घेवून जाणाऱ्या नागरिकांमध्येही सकाळपासून प्रचंड उत्साह दिसून येत होता.

बुद्धीचा देवता गणेशाच्या उत्सव दहा दिवस चालणार आहे. त्याची सुरुवात शनिवारपासून झाली. कराडच्या कुंभारवाड्यासह, रविवार पेठ, मंडई परिसर मलकापूर, ओगलेवाडी, विद्यानगर येथील मूर्ती विक्रेत्यांकडे सकाळ पासूनच गणेशमूर्ती घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. यावेळी वाहतुकीचा खोळंबा होवू नये, यासाठी ठिकठिकाणी वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले होते. वाहतुक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीत तात्पुरते बदल केले होते. सार्वजनिक गणेश मंडळे ट्रॅक्टर, मिनी टेम्पो, जीप अशा वाहनांमधून मूर्ती मंडळाच्या मंडपाकडे घेउन जात होते. या वाहनांमध्ये बसलेल्या कार्यकर्त्यांनी डोक्यावर केसरी रंगाच्या टोप्या तसेच गणपती बाप्पा मोरया अशा आशयाच्या केसरी पट्ट्या बांधल्या होत्या. घरगुती गणेशमूर्ती घेवून जाणारे नागरिक दुचाकी, चारचाकी वाहनांसह ऑटो रिक्षांचाही वापर करताना दिसत होते. काही घरगूती गणेश आगमनाच्या मिरवणुकीत बँजो, बँडचा वापर करण्यात आल्याचे दिसून आले. परगावच्या गणेशमंडळांनी शुक्रवारी रात्री तसेच शनिवारी सकाळीच गणेशमुर्ती कुंभारवाड्यातून नेण्यात आल्या. तर शहर परिसरातील मंडळांनी सायंकाळी उशिरापर्यंत गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करणे सुरुच होते.

घरगुती गणपती स्थापना करण्यात आलेल्या तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेशोत्सवासाठी सजावटीचे साहित्य खरेदी करायला येथील बाजारपेठेत भक्तांनी मोठी गर्दी केली होती. आपल्या लाडक्या बाप्पासाठी नैवेद्य म्हणून मिठाईच्या दुकानांमध्ये तयार मोदकांनाही मोठ्या प्रमाणावर मागणी होती. तसेच गणेशासमोर पाच प्रकारची फळे ठेवण्याची प्रथा आहे त्यामुळे आजच्या दिवशी फळांनाही मोठी मागणी होती. थर्माकॉलवर बंदी आल्याने सजावटीसाठी स्पंज तसेच कागदाच्या लगद्यापासून तयार करण्यात आलेल्या मंदिरांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असल्याने झेंडूच्या फुलांच्या किंमतीही वाढलेल्या दिसून आल्या.



# विलासकाकांचा पूर्णाकृती पुतळा सहकार चळवळीत काम करणाऱ्यांना प्रेरणास्त्रोत ठरेल

## ना. शंभूराज देसाई: खोडशी येथील कोयना दूध संघात विलासराव पाटील-उंडाळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**कराड** : आधुनिक महाराष्ट्राच्या विकासामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे मोलाचे योगदान असून स्वर्गीय विलासकाकाच्या रूपाने सहकारी चळवळीत काम करणारा एक दृष्टा नेता सहकार चळवळीला लाभल्याने सहकार चळवळीचे बळकटीकरण झाले. याच स्वर्गीय लोकनेते विलासकाकाच्या पूर्णाकृती पुतळा सहकार चळवळीत काम करणाऱ्यांना प्रेरणास्त्रोत ठरेल असे प्रतिपादन राज्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांनी केल

कराड येथील कोयना सहकारी दूध उत्पादक संघाच्या प्रांगणात लोकनेते स्वर्गीय विलासकाका पाटील उंडाळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा अनावर समारंभ प्रसंगी ते बोलत होते. पूज्यश्री काडसिद्धेश्वर स्वामीजी यांच्या शुभहस्ते यावेळी प्रमुख उपस्थिती राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, सातारा जिल्हा बँकेचे अध्यक्ष खा. नितीन पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व कराड तालुक्यातील सहकारी शिखर संस्थाचे प्रमुख अँड. उदयसिंह पाटील उंडाळकर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नितीन भुरगडे-पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, माजी सभापती भीमराव पाटील, कराड उत्तर भाजपचे मनोज घोरपडे, उद्योजक राम निंबाळकर, श्याम निंबाळकर, अँड. इंद्रजीत चव्हाण, अँड विजय पाटील, शिवनेरी शुगरचे संचालक युवा नेते अधिराज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कदम, मलकापूरचे उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे, माजी जि. प. सदस्य प्रदीप पाटील, शेती उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश पाटील, रयत संघटनेचे कार्याध्यक्ष प्रा. धनाजी काटकर, वसंतराव जगदाळे, कोयना दूध संघाचे चेअरमन लक्ष्मण देसाई, व्हा. चेअरमन शिवाजीराव जाधव, संघाचे कार्यकारी संचालक अमोल गायकवाड यासह जिल्ह्यातून आलेले विविध संस्थांचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

नामदार देसाई म्हणाले, राज्यातील सहकारी चळवळीमध्ये सहकार क्षेत्रात काम करणारे अनेक दिग्गज नेते पश्चिम महाराष्ट्राने राज्याला दिले. आधुनिक महाराष्ट्राच्या विकासामध्ये सहकारी संस्थांची मोलाचे योगदान आहे. गाव पातळीवर काम करणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सोसायटी पासून ते राज्यातील सहकारी शिखर संस्था पर्यंत सहकारी संस्थांचे मोठे जाळे निर्माण झाले. या सहकारी संस्थांच्या माध्यमातून अनेक उद्योग प्रकल्पाची उभारणी झाली. यातून समाजाची आर्थिक उन्नती बरोबर बेरोजगारांना रोजगार मिळाला. सहकार चळवळीमध्ये स्वर्गीय



लोकनेते विलासकाका पाटील उंडाळकर यांच्या रूपाने सहकारी चळवळीमध्ये दृष्टा नेता लाभला. सहकारी संस्थेमध्ये आर्थिक शिस्त व योग्य नियोजन कसे असावे याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे विलासकाकाच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या सहकारी संस्थांची आजही आर्थिक उन्नती पाहता ती दिसून येत आहे. नियोजनबद्ध व शिस्तप्रिय सहकार चळवळीतील दृष्टा नेत्याचा कोयना दूध संघाच्या प्रांगणात उभारण्यात आलेला पूर्णाकृती पुतळा सहकारी चळवळीत काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला प्रेरणास्रोत ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, स्वर्गीय विलास काकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये राजकीय सामाजिक सहकार क्षेत्रात काम केल. आपल्या योग्य शिस्तबद्ध नियोजनबद्ध मुळे सहकारी संस्थांच्या माध्यमातून सामाजिक आर्थिक विकास घडवून आणण्यात यश आले. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारधारेची कास धरत त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करत अत्यंत सर्वसामान्यातील सामान्य माणसाला राजकीय सत्तास्थानी देऊन कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण करण्यात त्यांना यश आले. सहकारी चळवळीचा पाया मजबूत करण्यात त्यांचा नेहमीच भर होता. त्यांचे सहकार क्षेत्रातील मोलाचे योगदान असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सहकारी संस्थांना आर्थिक उर्जितावस्था मध्ये आणण्यात त्यांना यश आले. त्यांच्याच विचाराचा वसा आणि वारसा जोपासत कराड तालुक्याचे नेते अँड उदयसिंह पाटील हे कार्यरत असून तालुक्यातील सहकारी शिखर संस्थेच्या मार्गदर्शन भूमिका बजावत सहकारी संस्थांची आर्थिक उन्नती साधली आहे.

पूज्य श्री काडसिद्धेश्वर स्वामीजी म्हणाले, विलास काका नास्तिक व मी आस्तिक असा आमच्यामध्ये विरोधाभास फरक होता. परंतु विलासकाका हे विज्ञानवादी लढवल्या कर्मठ कार्यकर्ता कार्यसम्राट म्हणून त्यांचा समाजावर आगळा वेगळा ठसा होता. त्यांच्या मतदारसंघांमध्ये अनेक वेळा विकास कामाच्या भूमिपूजन जाण्याचा योग आला. समाजातील शेवटच्या घटका विषयी असणारे तळमळ त्यांची पाहता समाजासाठी काहीतरी करण्याची तगमग पाहता असा दृष्टा नेता या तालुक्याला लाभला. समाजासाठी सतत उन्नतीचा विचार करणारा नेता म्हणून त्यांची एक आगळेवेगळी ख्याती होती. तत्त्वाशी बांधील असणारा विलासकाकांनी आपल्या तत्त्वाशी कधीही तडजोड केली नाही. अनेक आमिषाला बळी न पडता तत्त्वाशी कायम एक संघ राहणारा दृष्टा नेता म्हणून विलास काकाकडे बघितले जात होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या विचाराचा वसा आणि वारसा चालवणारे अँड. उदयसिंह पाटील हे काकांना अभिप्रत समाजप्रीत्यर्थ कार्य त्यांच्या हातून घडो अशी सदिच्छा व्यक्त केली.

प्रास्ताविक व स्वागत करताना अँड उदयसिंह पाटील म्हणाले, कोयना सहकारी दूध संघाच्या प्रगतीत विलासकाकांचे योगदान मोठे असून संघाला ऊर्जित अवस्थेतआणण्याचे काम केले. आज संघ एक लाख लिटर दूध संकलन करून विविध उपपदार्थाच्या माध्यमातून संघ प्रगतीपथावर असल्याचे सांगितले भविष्यात या संघाच्या वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी कोयना सहकारी दूध उत्पादक संघाच्या प्रांगणात लोकनेते स्वर्गीय विलासकाका पाटील उंडाळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा अनावरण विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी तालुक्यातील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, रयत संघटनेतील कार्यकर्ते, तरुण महिला व कोयना दूध संघाचे सर्व संचालक मंडळ सेवक वर्ग सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार कोयना दूध संघाचे चेअरमन लक्ष्मण देसाई यांनी मानले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील व तालुक्यातील विविध संस्थाचे पदाधिकारी तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’; दीड दिवसांच्या गणपती बाप्पाचे विसर्जन

७ सप्टेंबर रोजी आपल्या लाडक्या गणपती बाप्पाचे मोठ्या थाटामाटात आगमन झाले आहे. सर्वत्र मोठ्या उत्साहाचे वातावरण आहे. बाप्पाचे स्वागत ढोल ताशांचे वादन, मिरवणूक काढून मोठ्या आनंदात करण्यात आले. सगळीकडे आरत्यांचे शब्द ऐकू येत आहेत. गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस आणि ११ दिवस केली जाते. दरम्यान आज दीड दिवसांच्या गणपती बाप्पाला मोठ्या जड अंतकरणाने निरोप देण्यात आला आहे.

‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’ या जयघोषात दीड दिवसांच्या घरगुती गणपती बाप्पाला आज निरोप देण्यात आला. दीड दिवसांच्या बाप्पाचे आज जयघोषात विसर्जन करण्यात आले. दरम्यान आज दुपारनंतर गणपती विसर्जनाचा मुहूर्त होता. त्यामुळे आज संपूर्ण राज्यभरासह गणेशोत्सव प्रसिद्ध असणाऱ्या कोकणात देखील दीड दिवसांच्या गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले आहे. तर कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील घरगुती गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यात जवळपास १३ हजार गणपतींचे आज विसर्जन करण्यात आले. संपूर्ण राज्यभरात आज दीड दिवसांच्या गणपती बाप्पाचे मोठ्या जयघोषात, जड अंतःकरणाने विसर्जन करण्यात आले.

# पालखीतून आला राजवाड्यातील गणराया; खासदार शाहू महाराज यांनी केले पूजन




**कोल्हापूर** : नवीन राजवाड्यामध्ये आज, शनिवारी चतुर्थीच्या दिवशी पारंपरिक पद्धतीने श्री गणरायाचे आगमन झाले. तत्पूर्वी नवीन राजवाड्यावर पालखीतून आणलेल्या ... छाया- नसीर अत्तारकोल्हापूर: नवीन राजवाड्यामध्ये आज, शनिवारी चतुर्थीच्या दिवशी पारंपरिक पद्धतीने श्री गणरायाचे आगमन झाले. तत्पूर्वी नवीन राजवाड्यावर पालखीतून आणलेल्या या मूर्तीचे खासदार शाहू महाराज यांच्या हस्ते पूजन केले.

नवीन राजवाडा येथील गणपती बाप्पांचे आगमन सकाळी ११:४५ पर्यंत राजवाडा आवारात झाले. तेथून पालखीतून राजवाड्याकडे प्रस्थान झाले. राजवाड्यात विधिवत श्रींची प्रतिष्ठापना झाल्यानंतर याज्ञसेनीराजे छत्रपती, संभाजीराजे छत्रपती, मालोजीराजे छत्रपती, संयोगिताराजे छत्रपती, मधुरिमाराजे छत्रपती, शहाजीराजे छत्रपती आणि यशराजराजे छत्रपती यांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली.

पापाची तिकटी येथून राजवाड्यातील गणेशमूर्तीचे पालखीतून आगमन झाले. घोडेस्वार अग्रभागी होते तर शाही दंड हाती घेतलेल्या मानकऱ्यांचा शाही लवाजमा पालखीसोबत चालत राजवाड्यावर आला. नवीन राजवाड्यावर पालखीतून आणलेल्या या गणेशमूर्तीचे खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी छत्रपती घराण्यातील सर्व मान्यवर आणि मानकरी उपस्थित होते.